अतिरिक्त नगर अभियंता
बांधकाम विकास विभाग कार्यालय
जावक क्र. अनअ/जा/ज/८९८
दिनांक :- ४/११/११

# वैयक्तिक भोगवटापत्रासंबंधीची कार्यपध्दती

विषय – पुणे शहरातील भोगवटा पत्र न घेतलेल्या मिळकतीमध्ये सदनिकाधारकांना वैयक्तिक भोगवटा पत्र देणेबाबत.

संदर्भ –१. मा. मुख्य सभा ठ.क्र. ७४ दि. २४/५/२०११.

२. मा. महापालिका आयुक्त यांच्याकडील कार्यालयीन परिपत्रक जा.क्र. अनआ/जा/ज २९३ दि. १६/६/२०११.

३. मा. महापालिका आयुक्त ठराव क्र. ६/१२४ दि. ४/११/२०११

पुणे शहरातील भोगवटा पत्र न घेतलेल्या मिळकतीमधील सदनिकाधारकांना वैयक्तिक भोगवटा पत्र देणेबाबत मा. स्थायी समिती ठराव क्र. २५९४ दि. ८/२/२०११ व मा. मुख्य सभा ठराव क्र. ७४ दि. २४/५/२०११ संदर्भ क्र. १ अन्वये मान्यता दिलेली असून, त्यानुसार संदर्भ क्र. २ अन्वये वैयक्तिक भोगवटा पत्र देणेबाबत अंमलबजावणी करणेकरिता कार्यालयीन परिपत्रक प्रस्तृत केलेले आहे. सदरच्या मान्यतेनुसार वैयक्तिक भोगवटा पत्र मिळण्याकरिता कार्यपध्दती निश्चीतीकरिता मा. महापालिका आयुक्त यांचेकडे जा.क्र. झो–४/२१७१ दि. २६/०८/२०११ अन्वये निवेदन सादर केले होते. त्यावर संदर्भ क्र. ३ चे ठरावानुसार वैयक्तिक भोगवटापत्र देणे कामी कार्यवाही करण्याबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे आदेश प्राप्त झाले आहेत.त्यानुसार ,

प्रथम वैयक्तिक भोगवटापत्र मागणी केलेल्या सदनिकाचे मूळ बांधकामाचे विकसक/मालक यांचेवर संदर्भ क्र. २ च्या परिपत्रकातील मुद्दा क्र. ७ प्रमाणे, ज्या बिल्डरचे पूर्वीचे बांधकामास पूर्णत्वाचा दाखला घेण्यात आला नसेल तर, त्यांचे पुणे शहरातील अन्य ठिकाणी बांधकाम चालू असल्यास, त्या सर्व बांधकांमाना स्थगिती देण्यात यावी व सदर कृत्याबद्दल हितसंबंधितांना कळविण्यात यावे.त्यानंतर, खालीलप्रमाणे पुर्तता करुन घेण्यात यावी.

१.० –सदनिकांची मालकी सिध्द होण्यासाठी सदनिकाधारकांनी विकसक /जागा मालकांबरोबर केलेले नोंदणीकृत खरेदीखत अथवा तत्सम नोंदणीकृत दस्तऐवज सादर करणे बंधनकारक राहील.

२.० –पुणे महानगरपालिकेकडुन मिळकतीमधील कोणत्याही अंतर्गत सेवासुविधांची मागणी करणार नाही तसेच इमारतीच्या स्ट्रक्चरल स्टॅबिलीटीबाबत व सार्वजनिक सुरक्षिततेबाबत पुणे महानगरपालिका जबाबदार राहणार नाही, अशा आशयाचे संबंधित सदरनिकाधारकाकडुन हमीपत्र दाखल करून घेणे.

वरीलप्रमाणे पुर्तता करुन घेऊन, खालील प्रमाणे कार्यवाही करावी.

१. जागेवर मंजूर नकाशाप्रमाणे बांधकाम असल्याची खात्री करून जागेवरील पाणीपुरवठा व्यवस्था, ड्रेनेज व्यवस्था सुरळीत असल्याची खात्री करून सदर बांधकामास उद्‌वाहक (लिफ्ट) व अग्निशमन व्यवस्थेबाबतचे (नियमानुसार आवश्यकता असल्यास) ना हरकत पत्र घेऊन वैयक्तिक सदनिकाधारकनिहाय भोगवटापत्र अदा करणे.

२. जागेवरील बांधकाम / प्रकल्पामध्ये यापुर्वी पुणे मनपाकडून काही प्रमाणात सदनिकास भोगवटा पत्र दिलेले असेल व उर्वरित सदनिकांस वैयक्तिक भोगवटा पत्राअंतर्गत मागणी झाल्यास जागेवरील पाणी पुरवठा, ड्रेनेज व्यवस्थेसह अस्तित्वातील लिफ्ट व अग्नीशमन यंत्रणा व्यवस्थित रित्या कार्यान्वित असल्यास वैयक्तिक भोगवटा पत्र संबंधितांस अदा करणे.

३. ज्या बांधकाम इमारत/प्रकल्पामध्ये यापूर्वी सेवासुविधा विकसन करून संबंधित विभागांचे ना हरकत पत्र प्राप्त न करता सदनिकांचा विना भोगवटा वापर जर चालू केला असेल तर अशा मिळकतींकरिता पुणे महानगरपालिकेने विकसन निधी, सेवासुविधांच्या विकसन चार्जेस, यंत्रणेचे कनेक्शन व देखभालकरिता आवश्यक असणारी फि तसेच कर आकारणी विभागाकडील देय रक्कम, अग्निशमन प्रिमियम (लागू असल्यास) संबंधित सर्व सदनिकाधारकांकडून वसुल करणे क्रमप्राप्त आहे. त्यादृष्टीने सदनिकाधारकास जरी अंशतः भोगवटापत्र देण्यात आले असले तरी अंतिम भोगवटापत्र उपरोक्त आकारणीनंतर विकसकावर बंधनकारक करण्यात यावे.

४. भोगवटा पत्र न घेता वापर चालू असलेल्या सदनिकेच्या बांधकामांच्या विकसक व वास्तूविशारदावर संदर्भ क्र.२ अन्वये कारवाई करणेत यावी.

५. भोगवटापत्राचे अर्ज आवश्यक त्या नाहरकतपत्रासह दाखल करूनही मनपा प्रशासनाच्या दिरंगाईमुळे भोगवटा पत्र देण्यात न आलेल्या प्रकरणी तडजोड फि न आकारता संबंधितांस भोगवटापत्र देणे व संदर्भ क्र.२ अन्वये संबंधित अधिकारी, वास्तूविशारद व विकसक यांचेवरही जबाबदारी निश्चित करून योग्य ती कारवाई करणेत यावी.

मा.स.कळावे,

अति.नगर अभियंता
बांधकाम विकास विभाग
पुणे महानगरपालिका